ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 10 | ISSUE - 5 | JANUARY - 2024

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# 1962 ची सार्वत्रिक निवडणूक व सांगली जिल्ह्यातील डाव्या पक्षांचे राजकीय स्तरावरील यशापयश



**प्रो. डॉ. विवेकानंद राजाराम माने**
क्रांतिअग्रणी डॉ. जी. डी. बापू लाड महाविद्यालय, कुंडल
ता. पलूस जिल्हा सांगली.

## प्रास्ताविक:

भारतीय राज्यघटनेने लोकशाही शासन पद्धतीचा स्वीकार केला आहे. लोकशाही शासनव्यवस्थेत सत्ता स्थापन करण्यासाठी निवडणुका हा एक अविभाज्य भाग असतो. स्वातंत्र्योत्तर काळात राज्यघटनेची अंमलबजावणी सुरू झाल्यानंतर इ. स. 1952 मध्ये पहिली सार्वत्रिक निवडणूक घेण्यात आली. 1957 मध्ये दुसरी सार्वत्रिक निवडणूक घेण्यात आली. यावेळी संपूर्ण देशामध्ये भाषावार प्रांत रचना निर्माण झाली पाहिजे यासाठी चळवळ सुरु होती. द्विभाषिक मुंबई राज्यात भाषावार प्रांतरचनेसाठी विशेष करून संयुक्त महाराष्ट्रासाठी चळवळीने जोर धरला होता. संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या पार्श्वभूमीवर ही निवडणूक झाली यावेळी काँग्रेस सोडून इतर सर्व पक्षांची संयुक्त महाराष्ट्र समिती स्थापन झाली. 1957 च्या सार्वत्रिक निवडणुका समितीच्या नावावर लढविण्यात आल्या. सं. म. समितीच्या वतीने एस. एम. जोशी, आचार्य अत्रे, नाना पाटील, एस. ए. डांगे इत्यादी नेत्यांनी निवडणुकीच्या प्रचारकार्यात मोलाची कामगिरी बजावली संयुक्त महाराष्ट्र निर्माण न झाल्यामुळे जनता काँग्रेस पक्षावर नाराज झाली होती. तिच्या मनातील या असंतोषाला वाचा फोडण्याचे कार्य समितीच्या नेत्यांनी केले. या निवडणुकीत समितीने मुंबई प्रांतात काँग्रेस पक्षावर मात केली.

## संशोधनाची उद्दिष्टे :

- 1962 च्या सार्वत्रिक निवडणुकीचा अभ्यास करणे.
- 1962 च्या निवडणुकीत सांगली जिल्ह्यातील राजकारणाचा अभ्यास करणे.
- 1962 च्या निवडणुकीवर भाषावार प्रांतरचनाचळवळीच्या झालेल्या परिणामाचा अभ्यास करणे.
- 1962 च्या निवडणुकीतील डाव्या पक्षांचे यश आणि अपयश यांचे विश्लेषण करणे

## संशोधनाची गृहीतके:

- 1962 च्या निवडणुकीवर डाव्या पक्षांच्या चळवळीचा प्रभाव पडला आहे
- 1962 च्या निवडणुकीपूर्वी डाव्या पक्षांतील फुटीमुळेत्यांना प्रचंड पराभवाला सामोरे जावे लागले आहे.
- काँग्रेस पक्षाचा लोकसंपर्क, लोकसंग्रह व सत्तेचा प्रभाव अधिक आहे. त्याचा काँग्रेस पक्षाचा फायदा झाला आहे.

**संशोधनाचे महत्त्व :**

मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र झाल्यानंतर होणारी हि पहिलीच निवडणूक होती सीमा लढा तसेच भाषावार प्रांत रचना झाली पाहिजे यासाठी महाराष्ट्रात चळवळ सुरू होती. या पार्श्वभूमीवर 1962 ची निवडणूक झाली या निवडणुकीत महाराष्ट्रात डाव्या पक्षाना दारूण पराभवाला सामोरे जावे लागले. त्यांच्या धोरणांचा व कार्यपद्धतीचा अभ्यास करणे आवश्यक आहे

**राज्यातील निवडणूकपूर्व घडामोडी**

1962 मध्ये देशात तिसरी सार्वत्रिक निवडणूक घेण्यात आली. पहिल्या दोन सार्वत्रिक निवडणुकाप्रमाणेच या वेळीही लोकसभा आणि राज्यांच्या विधानसभा यांच्या निवडणुका एकत्रितपणे घेण्यात आल्या या तिसऱ्या निवडणुकीत कॉंग्रेस पक्षाला त्यांच्या अपेक्षेप्रमाणे प्रचंड यश मिळाले. लोकसभेच्या 494 जागापैकी कॉंग्रेस पक्षाने 361 जागावर विजय मिळवला. भाकपला 29 जागा मिळाल्या तर समाजवादी व प्रजा समाजवादी या दोन्ही पक्षानी मिळून 18 जागा जिंकल्या.

महाराष्ट्रात कॉंग्रेस व स.म.समिती या निवडणुकीच्या निमित्ताने एकमेकांचे प्रतिस्पर्धी होते 1 मे 1960 रोजी मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती झाल्याने स.म.समितीत ढिलाई निर्माण झाली. लवकरच समितीत मतभेद होऊन समितीतील एक घटक पक्ष असलेला प्रजा समाजवादी पक्ष (प्रसप) समितीतून बाहेर पडला. त्याचाही परिणाम समितीच्या कार्यावर झाला. एकूण 264 जागापैकी 215 जागा कॉंग्रेस पक्षाने जिंकल्या स.म.समितीतील शेकापला 15 जागा तर भाकपला 6 जागा मिळाल्या. प्रसपला 9 जागा मिळाल्या. अशा प्रकारे महाराष्ट्रात कॉंग्रेस पक्ष विजयी होऊन स.म.समिती पराभूत झाली.

**सांगली जिल्ह्यातील घडामोडी**

जुलै 1961 मध्ये सांगली जिल्हा लोकल बोर्डाचे शिराळा विभागातील शेकापचे कार्यकर्ते विष्णू बळवंत पाटील यांनी यशवंतराव चव्हाण यांच्या ध्येयधोरणावर निष्ठा व्यक्त करून कॉंग्रेसच या देशात समाजवाद आणेल असे म्हणून त्या विभागातील200 कार्यकर्त्यासह कॉंग्रेसमध्ये प्रवेश केला. त्यामुळे शिराळा भागात पक्ष संघटनेला मोठे खिंडार पडले

मिरज लोकसभा मतदार संघातून शेकापचे उमेदवार म्हणून1957 साली निवडून आलेले खासदार बी. पी. पाटील यांनी 1962 साली कॉंग्रेस मध्ये प्रवेश केला. जिल्ह्यात गिरणी कामगार संघटना मजबूत होती या संघटनेचे ते अध्यक्ष होते कॉंग्रेस पक्षाने गिरणी कामगार संघटना कमकुवत करण्यासाठी वापरलेल्या नितीचे ते बळी ठरले याचा कामगार संघटनेलाही थोडा फटका बसला.

सांगली जिल्ह्यात लोकसभा निवडणुकीत कॉंग्रेस पक्षाचे विजयसिंह डफळे हे विजयी झालेनिवडणुकीत डाव्या पक्षांनी आपला उमेदवार उभा न करता रिपब्लिकन पक्षातील रामचंद्र भंडारे यांना पाठिंबा दिला

विधानसभा निवडणुकीत शेकाप, भाकप, प्रजा समाजवादी हे डावे विचारांचे पक्ष एकमेकांविरूद्ध लढले त्यामुळे मतांची विभागणी होऊन या सर्व पक्षांना निवडणुकीत अपयश आले शेकापने सांगली मतदारसंघातून भगवानराव सुर्यवंशी तासगावमधून जी. डी. लाड, खानापूर मधून भगवानराव मोरे, वाळवा मतदारसंघातून प्रा एन. डी. पाटील, शिराळा मतदारसंघातून वाय सी. पाटील यांना उमेदवारी दिली होती. प्रसपने मिरज मतदारसंघातून गणपतराव माळवदे सांगली मतदारसंघातून भरमगांडा खोत्तासगाव मतदारसंघातून गणपतराव कोळी, खानापूरमधून सोपान पाटील यांना उमेदवारी दिली होती भाकपने मिरजेतून निवृत्ती कळके यांना उमेदवारी दिली होती. या सर्व उमेदवारांचा पराभव झाला. जिल्ह्यातील आठही मतदारसंघात कॉंग्रेसचे उमेदवार निवडून आले निवडणुकीतील डाव्या पक्षांचे उमेदवार व त्यांना मिळालेली मते पुढीलप्रमाणे.

## तिसरी सार्वत्रिक विधानसभा निवडणूक - 1962

| अ.क्र. | मतदारसंघ | उमेदवार | पक्ष | मिळालेली मते | स्पर्धक उमेदवारास मिळालेली मते | मतामधील फरक व निकाल |
|---|---|---|---|---|---|---|
| 1. | सांगली | भगवान ज्ञानदेव सूर्यवंशी | शेकाप | 6933 | 45672 | 38639 दुसऱ्या क्रमांकाची मते मिळून पराभूत |
| 2. | मिरज | निवृत्ती बाबूराव कळंके | भाकप | 6041 | 49921 | 43880 दुसऱ्या क्रमांकाची मते मिळून पराभूत |
| 3. | शिराळा | यशवंत चंद्रू पाटील | शेकाप | 11919 | 35864 | 23945 दुसऱ्या क्रमांकाची मते मिळून पराभूत |
| 4. | तासगाव | गणपती दादा लाड | शेकाप | 18932 | 33089 | 14197 दुसऱ्या क्रमांकाची मते मिळून पराभूत |
| 5. | वाळवा | नारायण ज्ञानू पाटील | शेकाप | 15589 | 44345 | 28756 दुसऱ्या क्रमांकाची मते मिळून पराभूत |
| 6 | जत | शिवाजी रामचंद्र शेडबाळे | शेकाप | 9861 | 28765 | 18904 दुसऱ्या क्रमांकाची मते मिळून पराभूत |
| 7. | खानापूर | भगवान नानासाहेब मोरे | शेकाप | 7887 | 30767 | 22880 दुसऱ्या क्रमांकाची मते मिळून पराभूत |

काँग्रेस पक्षाने स्वातंत्र्य लढ्याचे नेतृत्व केले होते त्यामुळे हा पक्ष जनमाणसात रुजला होता तसेच या पक्षाला नेहरूंचेप्रभावी नेतृत्व लाभले होते मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राची निर्मिती झाल्याने सम.समितीत ढिलाई निर्माण झाली. लवकरच समितीत मतभेद होऊन समितीतील एक घटक पक्ष असलेला प्रजा समाजवादी पक्ष (प्रसप) समितीतून बाहेर पडला त्याचाही परिणाम समितीच्या कार्यावर झाला. डाव्या पक्षामधील काही घटक पक्षांनी स्वतंत्र निवडणूक लढवल्यामुळे काँग्रेस पक्षाला फायदा झाला महाराष्ट्रातील सीमा लढ्याबाबत जनता आग्रही होती तरीही जनतेने काँग्रेस विरोधात न जाता काँग्रेसच्या बाजूने कौल दिला

### संदर्भ साधने :


1) पेंडसे लालजी, महाराष्ट्राचे महामंथन, लोकवाङमयगृह प्रकाशन, मुंबई, 2010,
2) धर्माधिकारी भा. वि., क्रांतिवीर, क्रांतिवीर नागनाथ (अण्णा) नायकवडी गौरव समिती वाळवे, 2007
3) फडके य. दि., विसाव्या शतकातील महाराष्ट्र, मौज प्रकाशन, मुंबई, 2007
4) यादव सुमित संभाजी, क्रांतिसिंह नाना पाटील, सातारा इतिहास संशोधन मंडळ, सातारा, 2015
5) इलेक्शन कमिशन ऑफ इंडिया, जनरल इलेक्शन,1952 पृ. 81
6) बॉम्बे लेजिस्लेटिव्ह असेंब्ली पृ. 307-308
7) रविकिरण साने, महाराष्ट्राचे शासन व राजकारण, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, 2009